| | | | |
|---|---|---|---|
| MHJN030021422019 | स्वीकारल्याचा दिनांक | : | २३.०७.२०१९ |
| | नोंदणी दिनांक | : | २३.०७.२०१९ |
| | निकालाचा दिनांक | : | २०.०५.२०२६ |
| | कालावधी | : | ०६ व. ०९ म. २७ दि. |

"भाग अ"

**प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३, जालना यांचे न्यायालयातील**

(पिठासीन अधिकारी श्रीमती एस. एन. पुंड)

**नियमीत फौजदारी खटला क्र.३८५/२०१९.** **निशाणी–५७**

| | | | |
|---|---|---|---|
| अभियोग पक्ष | :– | | महाराष्ट्र सरकार तर्फे<br>पोलीस ठाणे निरीक्षक,<br>पोलीस ठाणे तालुका जालना. |
| प्रतिनिधित्व | :– | | सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. इ. परकोटे. |
| | | | **–विरूध्द–** |
| आरोपी | :– | १. | अनिल गुलाबराव पाखरे,<br>वयः ३८ वर्ष, |
| | | २. | विलास पोपट पाखरे,<br>वयः २८ वर्ष, |
| | | ३. | कैलास पोपट पाखरे,<br>वयः २५ वर्ष, |
| | | ४. | पोपट हरीभाऊ पाखरे,<br>वयः ६० वर्ष,<br>सर्व रा. रेवगाव, ता. व जि. जालना. |
| प्रतिनिधित्व | :– | | विधीज्ञ श्री. के. एम. खान. |

**''भाग ब''**

| | |
|---|---|
| गुन्हा दिनांक | ०२.०४.२०१९ |
| प्रथम खबर अहवाल दिनांक | ०३.०४.२०१९ |
| दोषारोप पत्र दाखल दिनांक | २३.०७.२०१९ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | ०१.०२.२०२२ |
| न्यायनिर्णय राखीव दिनांक | २०.०५.२०२६ |
| न्यायनिर्णय दिनांक | २०.०५.२०२६ |
| शिक्षा दिल्याचा दिनांक, असेल | -- |

**आरोपींचा तपशील**

| आ. क्र. | आरोपींचे नाव | अटक दिनांक | जामीनवर सोडल्याचा दिनांक | दोषारोप | शिक्षा दिली किंवा मुक्त केले | किती शिक्षा झाली | पुर्वी तुरूंगात असल्यास तो काळ वजा केलेला असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनिल गुलाबराव पाखरे | ०५.०४.२०१९ | ०६.०४.२०१९ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ५०४, ५०६ | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| २ | विलास पोपट पाखरे | ०५.०४.२०१९ | ०६.०४.२०१९ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ५०४, ५०६ | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |
| ३ | कैलास पोपट पाखरे | ०६.०४.२०१९ | ०६.०४.२०१९ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ५०४, ५०६, | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| ४ | पोपट हरीभाऊ पाखरे | ०६.०४. २०१९ | ०६.०४. २०१९ | भा.दं.वि. कलम १४३, १४७, १४८, ३२४, ५०४, ५०६, | निर्दोष मुक्त केले. | -- | -- |

## ''भाग क''

## अभियोग पक्षाच्या साक्षीदारांची यादी

| साक्षीदार क्र. | साक्षीदाराचे नाव | साक्षीदाराचा प्रकार |
|---|---|---|
| सा. क्र.१ | मोहन सदानंद पाखरे | पंच साक्षीदार |

## अभियोग पक्षाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## बचाव पक्षाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्यायालयाचे निशाणी क्रमांक

| अनु.क्र. | नि.क्र. | वर्णन |
|---|---|---|
| १ | १ | दोषारोपपत्र |
| २ | २१ | दोषारोप |
| ३ | २२ ते २५ | आरोपींची जबानी |

## भौतीक वस्तू

| अनु.क्र. | साहित्य नंबर | वर्णन |
|---|---|---|
| १ | निरंक | निरंक |

# न्यायनिर्णय

(घोषित दिनांक २०.०५.२०२६)

सदरचे प्रकरण आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० चे कलम १४३, १४७, १४८, ३२४, ५०४, ५०६ च्या गुन्हयासाठी न्यायचौकशीस आहे.

**<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –</u>**

०२. दिनांक ०२.०४.२०१९ रोजी रात्री १०.०० वाजण्याच्या सुमारास रेवगाव येथे फिर्यादी आरोपी क्र.१ ला 'तू माझ्या बहिणीस का शिव्या देतो' असे म्हणाला असता विधी संघर्षीत बालक व सर्व आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवुन फिर्यादीस शिवीगाळ करून लाथा–बुक्यांनी मारहाण केली. त्यावेळी आरोपी क्र.१ याने फिर्यादीच्या डोक्यात काठीने मारून त्याला दुखापत केली. तसेच विधी संघर्षीत बालक व आरोपींनी फिर्यादीला शिवीगाळ करुन जिवे मारण्याची धमकी दिली. करिता फिर्यादीने पोलीस स्टेशन तालुका जालना येथे सदरची फिर्याद दिली.

०३. सदर फिर्यादीच्या आधारे तालुका जालना पोलीस स्टेशन येथे अपराध क्र.१३८/२०१९ नोंदविण्यात आला. त्यानंतर तपासिक अंमलदार श्री. एन. पी. कोरडे यांनी प्रकरणाचा पुढील तपास पूर्ण करीत आरोपींविरुध्द अंतिम अहवाल या न्यायालयासमोर सादर केला.

०४. सदर खटल्यात निशाणी क्र.२१ अन्वये आरोपींविरूध्द दोषारोप ठेवला व आरोपींस तो समजावून सांगितला असता त्यांनी निवेदन निशाणी क्र.२२ ते २५ प्रमाणे गुन्हा नाकबूल करून केस चालविण्याची विनंती केली.

०५. त्यानंतर संपरिक्षेच्या शेवटच्या टप्प्यांत मी सुविद्य सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. ए. इ. परकोटे आणि बचाव पक्षातर्फे आरोपींचे सुविद्य विधीज्ञ श्री. के.

एम. खान यांचा युक्तिवाद ऐकला.

०६. या संपूर्ण पार्श्वभुमीवर, माझे समोर निर्णयाकरिता पुढील विचाराधीन प्रश्न उद्‌भवलेत. या प्रश्नांना मी, त्याखालील नमुद कारणमिमांसेच्या बळावर तसेच अभिलेखी उपलब्ध पुराव्याचे आधारे, आज रोजी माझे निष्कर्ष नोंदविलेले आहेत.

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले काय की, आरोपी व विधी संघर्षीत बालक यांनी बेकायदेशीर जमाव जमवून त्याचे घटक बनले ? | ...नाही. |
| २. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले काय की, आरोपी व विधी संघर्षीत बालक यांनी बेकायदेशीर जमाव जमवून दंगा केला ? | ...नाही. |
| ३. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले काय की, आरोपी व विधी संघर्षीत बालक यांनी बेकायदेशीर जमाव जमवून काठी या प्राणघातक हत्यारानिशी सज्ज होऊन दंगा केला ? | ...नाही. |
| ४. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले काय की, आरोपी व विधी संघर्षीत बालक यांनी फिर्यादीच्या डोक्यात काठीने मारून त्याला इच्छापुर्वक दुखापत केली ? | ...नाही. |
| ५. | अभियोगपक्षाने हे शाबीत केले काय की, आरोपी व विधी संघर्षीत बालक यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करून अपमानित केले? | ...नाही. |
| ६. | अभियोगपक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपी व विधी संघर्षीत बालक यांनी फिर्यादी व साक्षीदार यांना फिर्यादीला जिवे मारण्याची धमकी दिली ? | ...नाही. |
| ७. | आदेश काय ? | आरोपी निर्दोष मुक्त |

## !! पु रा वा !!

०७. संपरिक्षेदरम्यान, अभियोग पक्षाने वर नमूद केल्याप्रमाणे केवळ १ साक्षीदाराचा तोंडी पुरावा या न्यायालयासमोर सादर केला. आरोपींविरुध्द अभिलेखावर

कोणताही सबळ पुरावा उपलब्ध नसल्यामुळे आरोपींचे स्पष्टीकरणात्मक फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ च्या कलम ३१३ प्रमाणेचे निवेदन नोंदविण्यात आले नाही. त्याउलट आरोपींतर्फे कुठलाही शाब्दीक व कागदोपत्री पुरावा दाखल करण्यात आला नाही.

## !! का र ण मी मां सा !!

**मुद्दे क्र.१ ते ६ बाबत:–**

०८. मुद्दे क्र.१ ते ६ हे एकमेकांशी निगडीत असल्याने कथनांची पुनरावृत्ती टाळणेकरीता त्यांची एकत्रीत चर्चा केली आहे.

०९. साक्षीदार क्र.१ मोहन सदानंद पाखरे हे घटनास्थळ पंच साक्षीदार असुन त्यांनी अभियोगपक्षास सहकार्य केले नाही. सदर साक्षीदारांनी पंचनाम्यावरील सही वगळता इतर मजकुर स्पष्टपणे नाकारला आहे व पंचनामा करतेवेळी ते हजर नसल्याचे सांगितले. तसेच अभियोगपक्षाने विचारलेल्या उत्तर सुचक प्रश्नांची त्यांनी नकारार्थी उत्तरे दिली.

१०. अभियोगपक्षाने सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, आरोपी व फिर्यादी एकाच परिसरातील रहिवाशी आहेत. घटनेच्या पुष्ठयर्थ केवळ साक्षीदार क्र.१ घटनास्थळ पंच यांनी आपला तोंडी पुरावा दिला आहे. अभियोगपक्षस पुरेशी संधी देऊनही ते उर्वरीत साक्षीदारांना साक्षीकामी हजर करण्यास अपयशी ठरले आहे. करिता, सदर साक्षीदार मिळुन आले नाही असा शेरा देत निशाणी क.१ वर आदेश पारित करण्यात आला. त्याचप्रमाणे अभियोगपक्षातर्फे साक्षीदार यादीतील साक्षीदार क्र.६ बिपीन पाखरे याला अभियोगपक्षाने तपासले नाही. याचाच अर्थ सदर साक्षीदार अभियोगपक्षास सहाय्य करत नसावा. फिर्यादी तसेच इतर महत्वाचे

साक्षीदार न्यायालयासमोर न येणे किंवा न्यायालयात उपस्थित असलेल्या साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहाय्य न करणे अशा अपुऱ्या पुराव्यावर विसंबुन राहुन आरोपींस दोषी ठरवणे योग्य व न्यायोचीत होणार नाही. म्हणुन आरोपींविरुध्द दोषारोपीत करण्यात आलेले गुन्हे की, आरोपी व विधी संघर्षीत बालक यांनी काठी या प्राणघातक हत्यारानिशी सज्ञ होऊन बेकायदेशीर जमाव जमवुन जंगा केला, फिर्यादीच्या डोक्यात काठीने मारुन त्याला दुखापत केली तसेच फिर्यादी व साक्षीदार यांना शिवीगाळ करून जिवे मारण्याची धमकी दिली, हे सिद्ध करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे. सबब, मी मुद्दे क्र.१ ते ६ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**<u>मुद्दा क्र.७ बाबत:-</u>**

११. अशाप्रकारे वरील केलेल्या विवेचणावरुन व अभिलेखावर उपलब्ध पुराव्यावरुन आरोपी हे संशयाचा फायदा मिळुन सदर गुन्हयातून मुक्त होण्यास पात्र आहेत. प्रस्तुत प्रकरणामध्ये अपील होण्याची शक्यता वाटत नसल्याने आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७(अ) जामीन कदब्याची व जात मुचलक्याची पुर्तता करणे आवश्यक वाटत नाही. सबब मुद्दा क्र.७ करिता मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१. अनिल गुलाबराव पाखरे, २.विलास पोपट पाखरे, ३.कैलास पोपट पाखरे, ४.पोपट हरीभाऊ पाखरे यांची भारतीय दंड संहिता कलम १४३, १४७, १४८, ३२४, ५०४, ५०६ प्रमाणे शिक्षेस पात्र अपराध केल्याचे आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम २४८(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचा वैयक्तिक जात मुचलका व जामीन कदबा रद्द करण्यात येत आहे.

३. जप्त मुद्देमाल एक काठी मुल्यहिन असल्याने तो अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आले.)

Digitally signed by
SUPRIYA NILESH
PUND
Date: 2026.05.20
16:56:50 +0530

जालना. **( श्रीमती एस. एन. पुंड )**

दिनांक: २०.०५.२०२६. **प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्या. क्र.३, जालना.**

**प्रमाणपत्र**

प्रमाणित करण्यात येते की, पी.डी.एफ. मधील शब्द न शब्द मुळ निकालपत्राप्रमाणे आहे.

लघूलेखकाचे नावः यु. आर. दसरे

न्यायालयाचे नावः प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.३, जालना.

मा. साहेबांनी चेक केले

व पी.डी.एफ. दिनांकः २०.०५.२०२६.

स्वाक्षरितर/–

लघुलेखकाची सही